**राज्यामध्ये शैक्षणिक केंद्र (एज्युकेशन हब) स्थापन करण्यासंदर्भात धोरणात्मक आराखडा तयार करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२४/ई-१००६१७१/विशि-३**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: २२ एप्रिल, २०२५

**वाचाः-**

१. शासन निर्णय, नियोजन विभाग क्र.संकिर्ण-२०२३/ प्र.क्र.११/ का.१४१२, दि.२५ मार्च, २०२३
२. माहिती व तंत्रज्ञान विभाग, शासन निर्णय क्र. GAD-IT 080/4/2014-O/O Directorate of IT-DIT (MH) Date: 05.10.2023

**प्रस्तावनाः**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० मुळे आंतरराष्ट्रीय विद्यापीठांना भारतात कार्यरत होणे शक्य होणार आहे. जागतिक सर्वोच्च विद्यापीठे राज्याच्या शैक्षणिक व्यवस्थेत कार्यरत झाल्यास जगातील सर्वोत्तम अध्यापन पद्धतीद्वारे राज्यातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांचे भविष्य उज्ज्वल होणार आहे. महाराष्ट्र राज्याने या संधीचा फायदा घेऊन या जागतिक विद्यापीठांना त्यांचे केंद्र राज्यात स्थापन करण्यासाठी पूर्व तयारी करणे आवश्यक आहे. राज्यात गतिमान परिस्थितीत उद्योगांच्या कुशल आणि अकुशल मनुष्यबळाच्या गरजा हाताळण्यासाठी राज्यात दर्जेदार शिक्षण, कौशल्य आणि संशोधन व विकास संस्था (शैक्षणिक केंद्रे) स्थापन होणे गरजेचे आहे. ही केंद्रे राज्यातील तरुणांच्या सक्षमीकरणासाठीच नव्हे तर आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांनासुद्धा आपल्या राज्याकडे आकर्षित करणार आहेत.

अशा शैक्षणिक केंद्रांमुळे उद्योग जगताला गरजेची असलेली दर्जेदार शिक्षित आणि कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करणारी रोजगार केंद्रेही तयार होणार आहेत. ज्यामुळे,  स्थानिक आर्थिक विकासालाही चालना मिळून राज्य आणि देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये भरीव योगदान मिळणार आहे.

ही बाब विचारात घेऊन याबाबत धोरणात्मक आराखड्याची शिफारस करण्यासाठी राज्यस्तरावर तत्कालीन अपर मुख्य सचिव (महसूल विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यीय

समिती संदर्भाधीन दिनांक २५ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आली होती. या राज्यस्तरीय समितीने केलेल्या शिफारशीनुसार राज्यात शैक्षणिक केंद्र (एज्युकेशन हब) स्थापन करण्याच्या अनुषंगाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाने स्वतंत्रपणे धोरण आखून त्यास मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. सदर समितीच्या शिफारशीनुसार संदर्भाधीन दिनांक ०५.१०.२०२३ च्या शासन निर्णयान्वये नामनिर्देशित केलेल्या एका सल्लागारी संस्थेकडून राज्यात शैक्षणिक केंद्र (एज्युकेशन हब) स्थापन करण्यासंदर्भात धोरणात्मक आराखडा तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :**

शासन निर्णय, नियोजन विभाग क्र.संकिर्ण-२०२३/ प्र.क्र.११/ का.१४१२, दि.२५ मार्च, २०२३ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या राज्यस्तरीय समितीने केलेल्या शिफारशीनुसार राज्यात शैक्षणिक केंद्र (एज्युकेशन हब) स्थापन करण्याच्या अनुषंगाने संदर्भाधीन दिनांक ०५.१०.२०२३ च्या शासन निर्णयामध्ये नामनिर्देशित असलेल्या M/S Pricewaterhouse Coopers Pvt. Ltd या सल्लागारी संस्थेकडून असा धोरणात्मक आराखडा तयार करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२५०४२२१८२७१०११०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=fabb29d28cdbcbe5c9eed052cb38b8cb567068a0090e237f095c6e50a52a6cf5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D96FF33E8AF31F745D84F3411F94D896382FAA82659B10108672887A87D6FC7C, cn=ASHOK SHANKAR MANDE
Date: 2025.04.24 12:10:14 +05'30'

**(अशोक मांडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११. सर्व सहसचिव/ उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. निवडनस्ती (विशि-३), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.